# आरोग्य विभाग - जिल्हा परिषद, चंद्रपूर

दुर्धर आजार योजना

## • योजनेचे नाव

**दुर्धर आजार योजना**

## • योजनेचा उद्दिष्ट आणि लाभ

विशिष्ट आजारासाठी प्राधिकृत केलेल्या रुग्णामध्ये हृदयरोग, किडनी व कॅन्सर या आजारावर उपचार घेतलेल्या रुग्णांना जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून मदत देण्यात येते.

## • योजनेचे फायदे /

हृदयरोग, किडनी व कॅन्सर अश्या दुर्धर रोगांनी पिडीत असलेल्या रुग्णांना जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून **रुपये १५,०००/-** प्रती लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो.

## • पात्रता निकष

१. रुग्ण हा हृदयरोग, किडनी व कॅन्सर या दुर्धर रोगाने पिडीत असल्या बाबतचे प्राधिकृत वैद्यकीय संस्थेच्या तज्ञ डॉक्टरचे अथवा जिल्हा शल्य चिकित्सकांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

२. रुग्ण हा संबंधित जिल्ह्याचा ग्रामीण भागाचा रहिवासी असावा.

३. रुग्ण हा भूमिहीन, अल्प भूधारक, दारिद्रय रेषेखालील अथवा स्वातंत्र्य सैनिक असल्यास प्राधान्य.

## आवश्यक कागदपत्रे

१. प्राधिकृत वैद्यकीय संस्थेचा तज्ञ डॉक्टराचे अथवा जिल्हा शल्य चिकित्सकांचे प्रमाणपत्र

२. ग्राम पंचायतीचा रहिवासी दाखला

३. आधार कार्ड

४. उत्पन्नाचा दाखला

५. दारिद्रय रेषेखालील दाखला

६. रुग्णाच्या बँक खात्याची झेरोक्स प्रत

## अर्ज करण्याची प्रक्रिया

**अर्जपत्र मिळविण्याचे ठिकाण:** आरोग्य विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर

**चरण १:** आरोग्य विभाग, जिल्हा परिषद चंद्रपूर येथे विहित नमुन्यामध्ये अर्ज सादर करण्यात येते.

## योजनेची अंमलबजावणी प्रक्रिया

**चरण १:** अर्जाची छाननी करून जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर यांच्याकडून पात्र लाभार्थी च्या बँक खात्यामध्ये रक्कम जमा करण्यात येते.

## जवाबदार अधिकारी व संपर्क माहिती

**जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर**

**योजना समन्वयक (जि.प. चंद्रपुर):**

नाव: वाय.बी. लांडगे

मोबाइल/फोन: ९१५८८३४८५१

**तक्रारीसाठी संपर्क:**

श्री. गणपत देवते (प्रशासकीय अधिकारी)

फोन: ७७४१८६२४२०

ईमेल: dhocha@gmail.com

## • योजना राबविण्याकरिता वापरलेले शासन निर्णय

ग्रामविकास व जलसंधारण विभाग पत्र क्र.- एलएफसी-२००६/प्र.क्र.४७७०/ वित्त-3 दिनांक ०३.११.२००६

© आरोग्य विभाग - जिल्हा परिषद, चंद्रपूर | दुर्धर आजार योजना